**जलयुक्त शिवार अभियानात उत्कृष्ट योगदान देणा-या पत्रकार यांना पुरस्कार देणेबाबत.- कालबध्द कार्यक्रम.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**
**शासन परिपत्रक क्र. मफुअ-२०१३ /प्र. क्र. ३७ /जल-८**
मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक : २४ ऑक्टोबर, २०१६.

वाचा :

ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक

(१) शासन निर्णय क्र. मफुअ-२०१३ /प्र. क्र. ३७ /जल-८, दिनांक २८ सप्टेंबर, २०१६.

(२) शासन परिपत्रक्र . मफुअ-२०१३ /प्र. क्र. ३७ /जल-८ दिनांक १० ऑक्टोबर, २०१६

**शासन परिपत्रक :**

राज्यातील टंचाईवर कायमस्वरुपी उपाय योजना करण्यासाठी शासनाने दिनांक ०५ डिसेंबर २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये जलयुक्त शिवार अभियान सुरु केले आहे. या अभियानात उत्कृष्ठ योगदान देण्या-या पत्रकार यांना पुरस्कार देण्यास संदर्भाधीन अ.क्र. १ येथील शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात आलेली आहे. सदर सर्व प्रकारच्या पुरस्कारांचे प्रस्ताव जिल्हास्तर समितीकडे दिनांक २० ऑक्टोंबर पर्यत पाठविण्याच्या, सदर जिल्हास्तरावरील पुरस्कार दि. ०२ नोव्हेंबर रोजीपर्यंत, विभागीय स्तरावर पाठविण्याच्या व १० नोव्हेंबर रोजीपर्यंत राज्यस्तरावर पाठविण्याच्या सूचना संदर्भाधीन अ.क्र.२ येथील शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. सदर पुरस्कार प्रदानाचे कार्यक्रम दिनांक २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर, २०१६ या दरम्यान घेण्याबाबत शासन स्तरावर विचाराधीन आहे. मुंबई व मुंबई उपनगर व इतर जिल्हयातील/क्षेत्रातील पत्रकारांचे विविध स्तरावर प्रस्ताव प्राप्त करुन घेणे, पुरस्कारांची अंतिम निवड करणे याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

## पुरस्कार निवडीचे प्रस्ताव पाठविण्यासाठी कालमर्यादा:-

१) सन २०१५-१६ या वर्षात “जलयुक्त शिवार अभियान” मध्ये भाग घेणाऱ्या मुंबई व मुंबई उपनगर या जिल्हयातील पत्रकार यांनी ज्या जिल्हयांच्या कामांची / जलयुक्त शिवार अभियानाची प्रचार प्रसिध्दी जनजागृती केली आहे अशा जिल्हयात पुरस्कार प्रस्ताव **जिल्हास्तर समितीकडे दिनांक २६.१०.२०१६ पर्यंत** सादर करावेत. मुंबई व मुंबई उपनगर क्षेत्रातील वृत्तपत्रात अशी प्रसिध्दी केली असल्यास, जिल्हास्तर समिती ठाणे, पालघर, रायगड यांच्याकडे प्रस्ताव सादर करावेत.

२) मुंबई व मुंबई उपनगर या जिल्हयातील पत्रकार यांनी ज्या महसूली विभागात जलयुक्त शिवार अभियानाची जनजागृती, पाणलोटाच्या यशोगाथा प्रकाशित केल्या असतील त्या पत्रकारांनी त्या विभागस्तरावरील समितीकडे व राज्यस्तरावर प्रचार प्रसिध्दी केली असल्यास राज्यस्तर समितीकडे विभाग व राज्यस्तर पुरस्कारासाठी नामांकने/प्रस्ताव **दिनांक २ नोव्हेंबर, २०१६ पर्यंत** सादर करावेत.

३) संदर्भाधीन शासन निर्णय अ.क्र.१ येथील पत्रकार पुरस्कार पात्रतेसाठीच्या इतर सर्व अटी लागू राहतील.

४) **इलेक्ट्रॉनिक मीडिया** पत्रकारांनी राज्यस्तर पुरस्कारासाठी संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांच्याकडे **दिनांक २/११/२०१६ रोजीपर्यंत** प्रस्ताव सादर करावेत.

५) राज्यातील सर्व जिल्हयातील पत्रकार यांच्यासाठी जिल्हास्तरावर प्रस्ताव पाठविण्याची मुदत दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ होती, त्यामध्ये बदल करण्यात आलेला नाही. मात्र, या पत्रकारांना विभाग व राज्यस्तर पुरस्कारांसाठी थेट भाग घ्यावयाचा असल्यास त्यांनी विभाग व राज्यस्तर पुरस्कारांसाठी नामांकने प्रस्ताव विभागस्तरावरील समितीकडे **दिनांक २६.१०.२०१६ पर्यंत** व राज्यस्तरावरील समितीकडे **दिनांक २ नोव्हेंबर, २०१६ पर्यंत** थेट सादर करावेत.

६) उपरोक्त सर्व सूचना /बदल सर्व उपसंचालक, माहिती व जनसंपर्क विभागीय कार्यालय व सर्व जिल्हा माहिती अधिकारी यांनी लक्षात घेऊन पुरस्कार प्रस्ताव अंतिम करण्याची कार्यवाही करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०२४१५५१५४८३२६ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shankar Trambak Jadhav

Digitally signed by Shankar Trambak Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=c83ebbb277c2e72c85231b87f684c424a13c398a4f921b6d167a8c859e9817f5, cn=Shankar Trambak Jadhav
Date: 2016.10.24 17:02:26 +05'30'

**( शं.त्र्यं.जाधव )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा. विधानपरिषद / विधानसभा विरोधी पक्ष नेता यांचे खाजगी सचिव
४. सर्व मा. राज्यसभा / लोकसभा / विधानपरिषद / विधानसभा सदस्य
५. मा. मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
६. मा. राज्यमंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
७. कार्याध्यक्ष, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती, पुणे.
८. मुख्य सचिव यांचे सचिव,
९. सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क (प्रसिध्दीकरीता),
११. सर्व विभागीय आयुक्त,
१२. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक महाराष्ट्र राज्य, पुणे.

१४. प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
१५. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण संस्था, पुणे,
१६. अपर मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा राज्यस्तरीय पणलोत विकास यंत्रणा पुणे
१७. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य,पुणे
१८. मुख्य अभियंता,लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर),पुणे
१९. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
२०. संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर,
२१. कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर.
२२. कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी/कुलगुरु पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
२३. कुलगुरु, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२४. सर्व जिल्हाधिकारी,
२५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,/सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
२६. सर्व सहसंचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
२७. सर्व सहसंचालक, (सामाजिक वनीकरण ),
२८. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२९. सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे,/सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे,(स्थानिक स्तर)
३०. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,/महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दी करीता),
३१. सर्व  जिल्हा अधिक्षक  कृषि अधिकारी,
३२. सर्व सहसंचालक,सामाजिक वनीकरण वृत्ते,
३३. सर्व मुख्य वनसंरक्षक, / सर्व उपवनसंरक्षक,
३४. सर्व उपसंचालक,सामाजिक वनीकरण.
३५. सर्व उपायुक्त (विकास),
३६. सर्व उपायुक्त (रोहयो),
३७. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३८. महालेखापाल -१/२, महाराष्ट्र राज्य ,मुंबई / नागपूर . (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता)
३९. अप्पर संचालक, एकात्मिक ग्रामीण विकास कक्ष,
४०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४१. निवासी लेखापरीक्षा, अधिकारी, मुंबई.
४२. जिल्हा  कोषागार अधिकारी, सर्व.
४३. नियोजन विभाग / वित्त विभाग, मंत्रालय , मुंबई
४४. सर्व उपसचिव / अवर सचिव/कक्ष अधिकारी,ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
४५. जल-८ (निवडनस्ती) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.